REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि माहितीचा अधिकार कायदा

ज्ञानेश्वर दत्तात्रय भागवत[१] , डॉ. प्रा. शरद घोडके[२]
[१] संशोधक विद्यार्थी
[2]मार्गदर्शक

## प्रस्तावना –

रूसोच्या मते, " प्रत्येक व्यक्ती हा निसर्गत:च स्वतंत्र आहे, पण विशिष्ट प्रकारच्या मानवी समुदायाच्या शृखलेने तो बंदिस्त झाला आहे." म्हणजेच प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचा हक्क निसर्गत:च प्राप्त झाला आहे, त्या हक्कालाच डावलले तर प्रत्येकाचे अस्तित्त्व धोक्यात येते. मनुष्य प्राण्याला त्याच्या अस्तित्त्वासाठी, सर्वांगीण विकासासाठी अभिव्यक्तीस्वातंत्र्याची गरज असते. लोकशाहीप्रधान देशात अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या संकल्पनेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. खऱ्या लोकशाहीचा अर्थ जाणून घ्यावयाचा असेल तर प्रत्येकाला अभिव्यक्तीस्वातंत्र्याबरोबरच माहितीच्या अधिकाराचेही स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे. कारण, माहिती हे प्रत्येक राष्ट्रातील नागरिकांच्या हातात असलेले एक साधन आहे. ते साधन नागरिकांना लोकशाहीमध्ये सहभागी करण्यासाठी प्रवृत्त करते. आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या काळात माहिती अधिकाराचे स्वातंत्र्य हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक विकासाबाबत मैलाचा दगड ठरले आहे.

इतर सजीवांप्रमाणे किंबहुना इतर सजीवांपेक्षा अधिक चांगल्यारितीने अभिव्यक्तीस्वातंत्र्य ही मनुष्य प्राण्याची नैसर्गिक गरज आहे. जगात लोकशाही आणि लोकशाहीची तत्त्वे बळकट करण्यासाठी झालेल्या विविध चळवळींमुळे भाषण व अभिव्यक्तीस्वातंत्र्यास मूलभूत स्वातंत्र्याचा दर्जा प्राप्त झाला आहे. जागतिक स्तरावर देखील अभिव्यक्तीस्वातंत्र्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. अभिव्यक्तीस्वातंत्र्य हा व्यक्तीगत स्वातंत्र्याप्रमाणेच न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चार लोकशाही मूल्यांवर आधारित मूलभूत मानवी अधिकार आहे. या अभिव्यक्तीस्वातंत्र्याचे भाषण आणि विचारस्वातंत्र्यासोबतचे नाते अतूट अन् घनिष्ठ आहे. वास्तविक पाहता, माध्यम कोणतेही असले तरी "अभिव्यक्तीस्वातंत्र्य" या शब्दाने केवळ बोलण्याचेच नव्हे, तर माहिती हवी असणे, माहिती मिळवणे, आणि माहिती देणे यांचे स्वातंत्र्यही यात अभिप्रेत आहे. आज आधुनिक काळात शासनसंस्था, धर्मसंस्था आणि समाजातील वेगवेगळे समाजघटक वेळोवेळी आपली सत्ता जपण्याकरिता, विरोधी विचारांवर नियंत्रण मिळविण्याकरिता अथवा विरोधी विचार नामशेष करण्यासाठी पहिला बळी अभिव्यक्तीस्वातंत्र्याचाच घेतात. या अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा बळी घेत असताना जनसामांन्यांपासून माहिती लपवून ठेवली जाते. परंतु, अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि माहितीचा अधिकार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, याचा समाजाचा एक जबाबदार नागरिक म्हणून आपल्याला विसर पडलेला असतो. आजच्या आधुनिक काळातील माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात माहितीच्या अधिकार कायद्यामुळे लोकशाहीचे नवे पर्व सुरू झाले आहे. यालाच सुराज्याच्या दिशेने जाणारे 'दुसरे स्वातंत्र्य' देखील म्हटले जाते. त्यामुळे माहितीच्या अधिकार कायद्याला घटनात्मक मूलभूत हक्काचा दर्जा प्राप्त झाला आहे. सुरूवातीच्या काळात माहितीचा अधिकार मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागला. पण माहितीचा अधिकार मिळवण्याचा संघर्षमय व रोमांचक कालखंड संपला आहे, आता या कायद्याच्या योग्य अंमलवजावणीचा व त्यातील व्यावहारिक अडथळ्यांचा आव्हानात्मक कालखंड सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि माहितीचा अधिकार कायदा यांच्यातील परस्पर संबंधांचा वेध घेणे आवश्यक आहे.




माहितीच्या अधिकारामुळे पारदर्शकता, उत्तरदायित्व, लोकसहभाग यांच्याप्रमाणे "अभिव्यक्तीस्वातंत्र्य" या शब्दालादेखील आता नव्याने अर्थ प्राप्त झाला आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. माहितीचा अधिकार कायद्याच्या निर्मिती

प्रक्रियेला खऱ्या अर्थाने १९९० नंतरच बळ मिळाले. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांसारख्या जागतिक स्तरावरील वित्तसंस्थांनी धोरणात्मक पाऊल म्हणून वित्तपुरवठा करताना शासकीय क्षेत्र भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी अधिक पारदर्शी बनविण्याची अट विकसनशील राष्ट्रांसमोर ठेवली. परिणामी, आज ९० पेक्षा जास्त देशांनी माहितीचा अधिकार कायद्याचा स्विकार केला आहे. एवढेच नव्हे तर, आज माहितीच्या अधिकार कायद्याला मूलभूत मानवी अधिकार म्हणून मान्यता मिळाली आहे, अन् त्याला अभिव्यक्तीस्वातंत्र्याचीही किनार लाभली आहे. त्यामुळे, माहितीच्या अधिकार कायद्याला जगभर मान्यता मिळणे ही लोकशाही विकासाच्या दृष्टीने अलीकडच्या काळातील सर्वांत महत्त्वाची घटना म्हणावी लागेल. संयुक्त राष्ट्रसंघाने देखील या कायद्याच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर धोरणात्मक भूमिका बजावली आहे. १९४८ साली आमसभेच्या पहिल्या अधिवेशनात " युनिव्हर्सल डिक्लेरेशन ऑफ ह्युमन राइट्सची " घोषणा करण्यात आली. या वेळी संमत केलेल्या ठरावात असे स्पष्ट म्हटले आहे की, "नागरिकांचे माहिती मिळण्याचे स्वातंत्र्य हा मूलभूत मानवाधिकार असून, तो संयुक्त राष्ट्रांनी मान्यता दिलेल्या नागरिकांच्या स्वातंत्र्याची आधारशीला आहे." संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेतील मानवी हक्काच्या वैश्विक जाहीरनाम्यातील कलम १९ मध्ये असे स्पष्ट म्हटले आहे की, "प्रत्येकाला स्वत:चे मत बनविण्याचे आणि ते व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे. या स्वातंत्र्यामध्ये कोणत्याही दबावाशिवाय, कोणत्याही माध्यमातून आणि कोणत्याही सीमांशिवाय किंवा हस्तक्षेपाशिवाय मत बनविणे, माहिती मागणे, माहिती घेणे व माहिती देणे तसेच माहिती आणि कल्पनांचे आदानप्रदान करणे अभिप्रेत आहे." माहितीचा अधिकार कायद्याची व्याप्ती पाहता, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धानंतर या कायद्याच्या प्रसाराला खऱ्या अर्थाने गती मिळाली. माहितीचा अधिकार कायद्याचा स्वीकार करणारा स्वीडन हा पहिला देश आहे. १७६६ मध्ये ' फ्रिडम ऑफ प्रेस ॲक्ट ' असा कायदा करून स्वीडनमध्ये माहितीचा अधिकार सर्वप्रथम मान्य करण्यात आला. १९५० मध्ये युरोपियन युनियनने देखील प्रत्येक व्यक्तीचा अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा अधिकार मान्य केला आहे. १९६६ मध्ये अमेरिकेने ' फ्रीडम ऑफ इनफर्मेशन ॲक्ट ' चा स्विकार करून अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा हिरिरीने पुरस्कार केल्याचे दिसून येते. जगातील इतर देशांतील या कायद्याच्या अंमलबजावणीच्या तुलनात्मक अध्ययनावरून असे दिसून येते की, बहुतांश सर्व विकसित देशांनी या कायद्याचा स्विकार केलेला आहे. भक्कम लोकशाही, नागरिकांचा सहभाग, शासनाचा पारदर्शक कारभार या सर्वांचाच माहितीच्या स्वातंत्र्याशी थेट संबंध आहे हे लक्षात येते. १६ डिसेंबर १९६६ मधील नागरी आणि राजकीय हक्कांच्या आंतरराष्ट्रीय करारनाम्यानुसार, नागरिकांचे मत आणि अभिव्यक्ती या दोन्ही स्वातंत्र्यात नागरिकांनी निवडलेल्या कोणत्याही माध्यमातून माहिती मागण्याचे, माहिती मिळवण्याचे आणि ती इतरांना देण्याचे स्वातंत्र्य सामावलेले आहे. तसेच या करारनाम्यामध्ये माहितीच्या अधिकाराचा वापर करणाऱ्यांसाठी काही कर्तव्य व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या. १९७८ साली युनेस्कोने जाहिर केलेल्या घोषणापत्रात देखील अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि माहितीचा अधिकार यांना मूलभूत मानवाधिकार व मूलभूत स्वातंत्र्याचा अधिकार यांचा अविभाज्य भाग मानण्यात आले. माहितीच्या अधिकाराशिवाय अभिव्यक्तीस्वातंत्र्याची संकल्पना अपुरी ठरते. म्हणूनच, संयुक्त राष्ट्रसंघाने भ्रष्टाचाराविरूध्द् माहितीच्या अधिकाराला एक तात्त्विक चौकट उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

जागतिक पातळीवर माहितीचा अधिकार कायद्याचा प्रसार व प्रचार होत असतानाच, भारतात देखील मानवाधिकाराच्या समर्थनार्थ चालविल्या जाणाऱ्या चळवळींच्या भूमिका महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत. वास्तविक पाहता, भारतीय राज्यघटनेने भारतीय जनतेला लोकशाही शासन पद्धतीचे अनेक लाभ मिळवून दिले. भारत विविधतेने नटलेला असताना भ्रष्टाचाराने, वेगवेगळ्या घोटाळ्यांनी ग्रासलेला असताना सुद्धा आपल्या देशाची वाटचाल ही गौरवास्पद अशी आहे. गौरवशाली वाटचालीत शासनाच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी आणि जबाबदार प्रशासन तयार करण्यासाठी शासकीय व्यवहाराची व कामकाजाची जास्तीत जास्त माहिती जनतेला मिळावी, यासाठी भारत सरकारने २००५ मध्ये जम्मू-काश्मीर सोडून माहितीचा अधिकार कायदा संमत करून खऱ्या अर्थाने लोकशाहीचा पाया बळकट झाल्याचे सिद्ध केलेले आहे. माहितीच्या अधिकारामुळे एक प्रकारे सामाजिक वृद्धी झाली आहे. माहिती मिळविणे हा प्रत्येक भारतीय नागरिकाचा मूलभूत हक्क झाल्यामुळे लोकशाहीचा पाया अधिक बळकट झाला आहे. स्थानिक स्वशासन संस्थांमध्ये माहिती अधिकार कायद्याच्या संदर्भात भारतीय व्यवस्थेमध्ये एक महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना भारतीय प्रशासन प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी प्राप्त झालेली आहे. माहितीच्या अधिकाराचा भारतातील उगम तपासताना भारतीय न्यायालयाच्या निर्णयांची एक मालिकाच आपल्यासमोर येते. राज्यघटनेतील अनुच्छेद १९(१)(क) मध्ये अभिव्यक्तीस्वातंत्र्याची तरतूद करण्यात आली आहे. राज्यघटनेतील तरतुदी व विविध कायद्यांतील तरतुदींचा अर्थ लावण्याचे अत्यंत महत्वाचे काम सर्वोच्च न्यायालय व विविध उच्च न्यायालय यांनी केले. जेव्हा राज्यघटनेत मूलभूत अधिकार दिलेले असतात, त्यामध्येच अनेक अधिकार अंतर्भूत असतात. मात्र, आपल्याला ते वरवर पाहता

कळत नाहीत. अनुच्छेद १९(१)(क) मधील भाषण आणि अभिव्यक्ती या स्वातंत्र्यामध्येच माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे आणि म्हणूनच माहितीचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे, असा अर्थ सर्वोच्च व उच्च न्यायालयांनी विविध न्यायनिर्णयात स्पष्ट केला. याशिवाय राज्यघटनेतील अनुच्छेद २१ मधील जगण्याच्या स्वातंत्र्याचा अर्थ लावताना भारतीय न्यायालयांनी अनेक महत्त्वाच्या निवाड्यांत मूलभूत अधिकारात विस्तार केला आणि माहितीचा अधिकार मूलभूत अधिकारात समाविष्ट असल्याचे स्पष्ट केले आहे, म्हणूनच माहिती अधिकाराच्या कायद्याच्या इतिहासात नागरिकांच्या मूलभूत हक्काचे रक्षण करणाऱ्या न्यायव्यवस्थेचा सर्वात महत्त्वाचा सहभाग आहे.

शासन व्यवहाराची माहिती मिळाली नाही तर नागरिक आपले मत कसे व्यक्त करणार आणि मतदानाच्या माध्यमातून लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी ते कसे अभिव्यक्त करणार, असा प्रश्न उपस्थित करून राज्यघटनेच्या अनुच्छेद १९(१)(क) मध्ये नमूद असलेले भाषण आणि अभिव्यक्ती यांचे स्वातंत्र्य म्हणजेच घटनादत्त माहितीचा अधिकार आहे. सर्वसामान्य नागरिकांना लोकशाहीच्या प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदविण्याचे काम या कायद्यांतर्गत नमूद करण्यात आले आहे.

एल. के. कुलवाल विरुद्ध जयपूर महानगरपालिका या खटल्यात न्यायमूर्ती डी. एल. मेहता यांनी माहिती अधिकार हा घटनेचा कलम १९ मधील अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा एक भाग आहे, असे स्पष्ट केले होते. न्यायमूर्ती मेहता यांनी कलम १९ बरोबरच राज्यघटनेच्या कलम ५९ (अ) चाही आधार यासंदर्भात घेतला होता, नागरिकांनी कर्तव्ये स्पष्ट करणारे हे कलम राज्यघटनेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेले आहे. नागरिकांना त्यांची कर्तव्ये पार पाडावयाची असतील तर राज्य कसे चालू आहे, हे जाणून घेणे आवश्यक आहे. तसे झाले तरच राज्याविषयीची आपली कर्तव्ये नागरिकांना चांगल्या प्रकारे पार पाडता येतील, असे त्यांनी या निकालपत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे. माहितीचा अधिकार हा राज्यघटनेतील मूलभूत अधिकाराचा भाग आहे, असे स्पष्ट करणारा आणि ऐतिहासिक स्थान असलेला असा हा पहिला निकाल आहे. माहितीचा अधिकार हा नागरिकांचा मूलभूत आवश्यकता असलेला अधिकार आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने Reliance Petro-Chemicals विरुद्ध Indian Express या निकालातही म्हटले आहे. भारतातील माहिती अधिकारासंदर्भात इतिहासातील काही महत्त्वाच्या न्यायनिवाड्यांवर एक नजर टाकल्यास माहितीचा अधिकार कायदा अस्तित्त्वात येण्यासाठी न्यायालयांनी भरीव योगदान दिल्याचे लक्षात येते.

उत्तर प्रदेश शासन विरुद्ध राज नारायण व इतर (१९७५) या माहितीच्या अधिकाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या ठरलेल्या निवाड्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मॅथ्यू यांनी आपले मत नोंदविताना असे म्हटले आहे की, आपल्यासारख्या जबाबदार लोकशाही शासनामध्ये कमीत कमी गुपिते असावीत. या देशातील नागरिकांना सार्वजनिक निधीतून होणाऱ्या खर्चाचा सर्व तपशील जाणून घेण्याचा अधिकार आहे. सर्व शासकीय यंत्रणा या नागरिकांना उत्तरदायी असल्या पाहिजेत, हाच एक आणि पारदर्शी शासनाचा पाठ आहे. शासनाने जी व्यवस्था चालविण्याचे ध्येय समोर ठेवले, ती एकूणच सुटसुटीत व सहजरीत्या असावी.

मेनका गांधी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (१९७८) या निवाड्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेतील अनुच्छेद १९(१) बाबत असे म्हटले आहे की, भाषण आणि अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याला भौगोलिक सीमा नसतात. नागरिक माहिती मिळविण्यासाठी आणि स्वत:चे मत व्यक्त करण्यासाठी असा अधिकार कोठेही व केव्हाही वापरू शकतात. या प्रकरणामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे न्या.कृष्णा अय्यर यांनी असे नमूद केले की, 'जे सरकार गोपनीयतेच्या वलयातच कामकाज करते, ते केवळ लोकशाही मूल्यांच्या विरोधात काम करते असे नव्हे, तर असे शासन स्वत:च्या कृतीनेच लोकशाही शासनाचे मूल्य संपवत असते. माहिती अधिकार कायद्यासंदर्भात मत प्रकट करत असताना माहिती मागविण्यासंदर्भात बंधन असता कामा नये. कारण माहितीचे स्वरूप कशा प्रकारे आहे, यावर अवलंबून असते.

एस.पी.गुप्ता विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (१९८२) या निवाड्याला माहिती अधिकाराचा इतिहास असे म्हणतात. या निवाड्यात प्रथम राज्यघटनेच्या अनुच्छेद १९(१) मधील नागरिकांचा भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क व लोकशाहीतील खुल्या शासनाची संकल्पना विस्तारित करण्यात आली. माहिती राखून ठेवण्याच्या शासनाच्या हक्काचा व नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराचा अर्थ लावताना अनुच्छेद १९(१) मधील भाषण व अभिव्यक्ती या स्वातंत्र्याचा हक्क हीच माहिती अधिकाराची घटनात्मक हमीसुद्धा आहे, हे मानण्यात आले. म्हणजे यामध्येच माहिती अधिकार अंतर्भूत आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. भारतीय राज्यघटनेमध्ये ज्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करण्यात आला, त्याचाच एक भाग म्हणून माहिती अधिकार कायद्याकडे पाहिले जाते.

इंडियन एक्स्प्रेस न्यूजपेपर्स प्रा.लि. व इतर विरुद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर (१९८५) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने प्रसार माध्यमांच्या भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ लावताना असे म्हटले की, ''माध्यमांचे भाषण व

अभिव्यक्ती यांचे स्वातंत्र्य'' हे लोकशाही प्रणालीतील पायाभूत घटक आहे आणि ज्यामुळे अशा स्वातंत्र्यावर निर्बंध आणले जातील अशा प्रत्येक बाबतीत न्यायालय या हक्काच्या संरक्षणाची भूमिका घेईल. माध्यमाच्या भाषण व अभिव्यक्ती या स्वातंत्र्याचे तीन महत्त्वाचे घटक सर्वोच्च न्यायालयाने अधोरेखित कले आहेत, ते म्हणजे (१) सर्व मार्गाने माहिती मिळवण्याचा हक्क, (२) माहिती प्रसिद्ध करण्याचा हक्क, (३) प्रसिद्ध केलेली माहिती वितरित अथवा प्रसारित करण्याचा हक्क. जेणेकरून प्रसार माध्यमाच्याद्वारे माहिती शासन व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक आहे. हा महत्त्वाचा घटक नागरिकांपर्यंत पोहोचला पाहिजे.

रिलायन्स पेट्रोकेमिकल्स लिमिटेड विरुद्ध प्रोपायटर्स ऑफ इंडिया एक्स्प्रेस न्यूजपेपर्स प्रा. लि. व इतर (१९८५) या निवाड्यात रिलायन्स पेट्रोकेमिकल्स लिमिटेड या कंपनीने काही परिवर्तनीय कर्जरोखे बाजारात आणण्याचे ठरविले होते. यासंदर्भात काही खटले निरनिराळ्या न्यायालयांत दाखल झाले. हे खटले चालू असताना इंडियन एक्स्प्रेस या वृत्तपत्र समूहाने याबाबत आपले मतप्रदर्शन केले. त्याबाबत या वृत्तपत्राने आपले मतप्रदर्शन करणारे लेख प्रसिद्ध करू नयेत, असा मनाई हुकूम मागणारे एक प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे मत नोंदवले. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, यंत्रयुगातील जीवन आणि लोकशाही यांच्यातील नागरिकांच्या सहभागाने होणाऱ्या विकासात लोकांना भाग घेण्यासाठी माहितीचा अधिकार हा नागरिकांना मूलभूत अधिकार म्हणून महत्त्वाचा आहे. आधुनिक युगात हे महत्त्वाचे आयुध म्हणून लाभलेले वरदान आहे.

पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टी विरुद्ध युनियन ऑफ इंडिया (२००४) या प्रकरणाच्या निवाड्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने माहितीच्या अधिकाराला मानवी हक्काचा दर्जा दिला आणि शासन, प्रशासन पारदर्शी आणि उत्तरदायी करण्यासाठी शासनामध्ये नागरिकांचा सहभाग वाढला पाहिजे आणि त्यासाठी राज्यघटनेच्या अनुच्छेद १९(१)(क) मधील भाषण व अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यामध्येच माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे, यावर भर देण्यात आला. माहिती अधिकार कायदा सर्वसामान्य जनतेला मिळाला आहे.

वरील सर्व न्यायनिवाड्यांमध्ये कल्याणकारी राज्य व शासनाच्या अधिकाराच्या वापरावरील नागरिकांच्या आवश्यक अंकुशाबाबत भाष्य करण्यात आले आहे. तात्पर्य काय तर नागरिकांचे भाषण व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हे माहितीचा अधिकार ध्वनित करतात व प्रगल्भ लोकशाहीसाठी ते आवश्यक असतात. म्हणूनच सर्वसामान्य स्वरूपाची माहिती सर्वांनाच सहजपणे उपलब्ध झाली पाहिजे, असे माहितीच्या अधिकार कायद्यात अपेक्षित आहे.

माहितीचा अधिकार कायदा भारतात संमत होण्यापूर्वी सततपणे माहीतगार नागरिकांचे गट अशी तक्रार करीत असत की, शासनाच्या धोरण निश्चितीच्या प्रक्रियेत निर्णयप्रक्रियेत आणि अंमलबजावणी प्रक्रियेत नागरिकांना सहभागी होता येत नाही. वरील बाबींमध्ये हस्तक्षेप करण्याची संधी फक्त मूठभर लोकांनाच मिळते, यामुळे नागरिकांमध्ये लोकशाहीविषयी तुटलेपण निर्माण झाल्याबद्दल सतत चर्चा होत असते. वरील सर्व परिस्थितीला छेद देण्याची शक्यता माहितीच्या अधिकारामुळे निर्माण झाली आहे. पारदर्शकता, उत्तरदायित्व व लोकसहभाग या शब्दांनी नवीन अर्थ माहितीच्या अधिकारामुळे निर्माण झाला. पारदर्शकतेच्या आग्रहाला जनसुनावण्यांचे खास भारतीय रूप देऊन राजस्थानातील मजदूर किसान शक्ती संघटनेने सामाजिक लेखापरीक्षण प्रक्रियेला विधायक वळण दिले. यापासून प्रेरणा घेऊन अनेक संघटनांनी या कायद्याच्या निर्मितीत दबावगट म्हणून काम केले. माहिती अधिकार कायद्याच्या निर्मितीला उपरोक्त अनेक आंतरराष्ट्रीय संदर्भ होते, तसेच भारतीय सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांचे व विविध चळवळींच्या कार्यकर्तृत्वाचे पाठबळही होते.

राज्यकर्ते व नोकरशाही यांच्या विरोधाला न जुमानता नागरिकांच्या भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्यातच हा माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे, अशी विविध न्यायालयांनी वेळोवेळी भूमिका घेतली. भारतीय राज्यघटनेच्या तत्त्वज्ञानातच माहितीच्या अधिकाराचे मूळ आहे असे न्यायपालिकेने मानले, तसेच राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ मधील समतेचा अधिकार व अनुच्छेद २१ मधील व्यक्तिगत स्वातंत्र्य किंवा जगण्याचा अधिकार यांच्यामध्ये माहितीच्या अधिकाराचे गर्भित अस्तित्व मान्य करण्यात आले आहे. हममर्द दवाखाना विरूध्द् भारत सरकार या प्रकरणात भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्यात सार्वजनिक हिताचा विचार व माहितीचा अधिकार समाविष्ट आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. १९७५ मध्ये राजनारायण विरुद्ध उत्तर प्रदेश सरकार या खटल्याच्या निकालपत्रात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मॅथ्यू यांनी स्पष्ट केले की, आपल्यसारख्या जबाबदार शासन असलेल्या देशात फार थोड्या गुप्त गोष्टी असू शकतात. एस.पी. गुप्ता विरुद्ध भारत सरकार या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले की, लोकशाही व्यवस्था स्वीकारलेल्या देशात उत्तरदायित्वाविना शासन सत्तेवर राहू शकत नाही. शासनाच्या पारदर्शक कारभाराचा थेट संबंध माहितीच्या अधिकाराशी आहे. हा अधिकार राज्यघटनेच्या अनुच्छेद १९(१)(क) मध्ये अंतर्भूत आहे. शासकीय आदेश, शासन निर्णय जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या प्रक्रियेला कायदेशीर रूप देण्याची आवयश्यकता न्यायालयाने प्रतिपादन केली व त्यामुळे माहिती अधिकाऱ्याच्या संकल्पनेला बळ मिळाले. ओरिसा उच्च

न्यायालयाचे न्यायमूर्ती व पर्यावरणवादी विचारवंत पूर्णचंद्र मिश्रांच्या मते, ''स्वातंत्र्य अधिकाराची प्रभावी अंमलबजावणीसाठी नागरिकांना ज्यासंदर्भात त्या अधिकारांचा वापर करायचा आहे, त्याची माहिती असणे नितांत आवश्यक आहे. अन्यथा अनुच्छेद १९(१)(क) मधील स्वातंत्र्य निरर्थक ठरेल किंवा तो अधिकार नाकारल्यासारखे होईल'' थोडक्यात, सर्वोच्च न्यायालयाने माहितीच्या अधिकाराला राज्यघटनेतील मूलभूत अधिकारांचा दर्जा असल्याचे स्पष्ट केले आहे. बेरोजगारी व कल्याणकारी योजनांची ढिसाळ अंमलबजावणी, अभिव्यक्तीस्वातंत्र्याची गळचेपी, नोकरशाहीचा पगडा यांना विरोध करताना विविध राज्यातील चळवळी, तसेच स्वयंसेवी संस्थांनी माहितीच्या अधिकाराचा प्रश्न उचलून धरला. परिणामी, या कायद्यातून जनतेमध्ये निर्माण झालेली चेतना व लोकसहभागाची शक्यता यांच्यामुळे व्यावहारिक, सैध्दांतिक व नैतिकदृष्ट्या सक्षम अशा माहितीच्या अधिकार कायद्याची पायाभरणी झाली.

असे जरी असले तरी, भाषण व अभिव्यक्तीस्वातंत्र्य हे सध्याच्या समाजव्यवस्थेत एक कोडे असल्यासारखे वाटते. एकीकडे अभिव्यक्तीस्वातंत्र्य महत्त्वपूर्ण आहे असे आपण म्हणतो, अन् दुसरीकडे याच अभिव्यक्तीस्वातंत्र्याला पुरेसे कायद्याचे संरक्षण प्राप्त झाल्याचे दिसते. अलिकडच्या काळात प्रक्षोभक व द्वेषपूर्ण भाषणांचे होणारे दुष्परिणाम हा सुध्दा चिंतनाचा विषय आहे. त्यामुळे लोकशाहीमध्ये नागरिकांना व प्रसारमाध्यमांना अभिव्यक्तीस्वातंत्र्य असावे हे जरी खरे असले तरीसुध्दा नागरिकांच्या काही विशिष्ट प्रकारच्या भाषणातून व अभिव्यक्तीस्वातंत्र्यातून होणाऱ्या दुष्परिणामापासून रक्षण व्हावे या मुद्दयाचा विचार करणे गरजेचे झाले आहे. आपण अभिक्तीस्वातंत्र्याचे समर्थन करत असलो, तरीपण प्रत्यक्षात नागरिकांनी काय पाहावे, काय वाचावे किंवा काय ऐकणे योग्य आहे यासंबंधी कायदे केले जातात. उदा. भारतामध्ये सर्व चित्रपटांना केंद्रीय सेन्सॉर बोर्डाचे प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. विशिष्ट समुदायाच्या भावना दुखावल्या जातील या कारणांखाली चित्रपटातून काही दृष्य कापली जातात किंवा त्या संपूर्ण चित्रपटालाच विरोध केला जातो. ( नुकताच पद्मावती चित्रपटावरून झालेला वाद ) ''अभिव्यक्तीस्वातंत्र्याचे तत्त्व'' हे इतर स्वातंत्र्याच्या तत्त्वापेक्षा भिन्न आहे हे आपण विचारात घेतले पाहिजे. भाषण, लेखन, चित्रपट, नाटक, संगीत, पत्रकारिता इत्यादी अभिव्यक्तीस्वातंत्र्याची विविध माध्यमे आहेत. या माध्यमांना अधिक व विशेष संरक्षणाची आवश्यकता आहे. पण त्यासाठी माध्यमांनी व्यक्त केलेले विचार अन् भाषणांमध्ये कोणते गुण व दोष आहेत याचासुध्दा विचार करणे आवश्यक आहे. अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या संकल्पनेत सत्य, असत्य, खोट्या आणि फसव्या भाषणाचांसुध्दा परामर्श घेणे गरजेचे आहे. अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या संदर्भात पहिला दृष्टीकोन असा मांडता येईल की, जर आपल्याला अभिव्यक्तीस्वातंत्र्याचे समर्थन करावयाचे असेल तर त्याचा संबंध वैयक्तिक स्वातंत्र, लोकशाही, सहिष्णुता इ. नैतिक मूल्यांशी जोडावा लागेल. परंतु जर या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी अभिव्याक्तीस्वातंत्र्यावर बंधन आणणे आवश्यक आहे हे आपण मान्य केले तर अभिव्यक्तीस्वातंत्र्याचे समर्थन करणे कठीण होऊन बसेल. याबाबत दुसरा दृष्टीकोन असा मांडता येईल की, अभिव्यक्तीस्वातंत्र्याचे मूल्यांकन हे अन्य नैतिक तत्त्वाच्या आधारावर करता येऊ नये. अभिव्याक्तीस्वातंत्र्याला स्वत:चे मूल्य असावे. याचा अर्थ असा की, मुक्त अभिव्यक्तीस्वातंत्र्य हे एक मूल्य मानण्यात यावे आणि त्याला अन्य तत्त्वांकडून समर्थन प्राप्त करण्याची आवश्यकता असू नये. अभिव्यक्तीस्वातंत्र्य कधीही कोणालाही इजा करीत नाहीत. त्यामुळे अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि भाषणांवर, समाजहिताची माहिती मिळविण्यावर कोणतेही बंधन असता कामा नये. पण प्रत्यक्षात आपण हे मत मान्य करू शकत नाही. कारण जातीय वा वांशिक द्वेष निर्माण करणाऱ्या भाषणांचे आणि माहितीचे गंभीर परिणाम होऊ शकतात. थोडक्यात, माहिती आणि भाषणामुळे घडून येणारी कृती यामध्ये स्पष्ट सीमारेषा आखता येत नाही.

स्वातंत्र्याच्या संदर्भात थोर व प्रसिध्द् विचारवंत जॉन स्टुअर्ट मिल यांचे विचार महत्त्वपूर्ण आहेत. त्यांच्या '' ऑन लिबर्टी '' या ग्रथांत असे नमूद केले आहे की, एका व्यक्तीचा आवाज दडपवून टाकण्याचा मानवी समुदायाला अधिकार नाही. कारण त्या व्यक्तीचे मत जर सत्य असेल तर समस्त मानवजाती सत्यापासून मुकेल. त्यामुळेच, मिलने अभिव्यक्ती अन् भाषणस्वातंत्र्याचे समर्थन केले आहे. मिलने अभिव्यक्तीस्वातंत्र्याबाबत जी भूमिका घेतली होती; तिचे दोन भाग आहेत. पहिला भाग असा आहे की, एखाद्या व्यक्तीच्या सत्य बोलण्याकडे जर आपण दुर्लक्ष केले तर जग त्या सत्यापासून मुकेल. परंतु, जर त्या मनुष्याचे मत असत्य असेल तर प्रस्थापित असलेले सत्य हे मृतवत् आहे असे समजावे. मिलच्या मते, व्यक्तीने मांडलेले एखादे मत किंवा विधान हे सत्य की असत्य आहे हे तपासून पाहण्याचा अधिकार केवळ एका व्यक्तीला असू शकत नाही. जेव्हा विविध मते, कल्पना व विश्‍वास बाळगणाऱ्या व्यक्ती एकत्रित येऊन मुक्तपणे मिळालेल्या माहितीच्या आधारे चर्चेच्या माध्यमातून विचारांची देवाण–घेवाण करतील तेव्हाच सत्याचा अन् अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा अविष्कार होऊ शकतो. दुसरा भाग असा आहे की, जर प्रत्येक व्यक्तीला आपले मत व्यक्त करण्याची समान संधी प्राप्त होत असेल तरच समाजातील समस्या सुटू शकतील. जर मत व विचारांची विविधता असेल तरच सत्याच्या सर्व पैलूंचा अविष्कार शक्य आहे. प्रत्येक व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची समान संधी असावी. मिलच्या मते, प्रत्येक परिस्थितीमध्ये सत्याचा आविष्कार होईलच असे नाही. कारण अनेक परिस्थितीमध्ये

न्याय, शांततेची स्थापना, व्यक्तीचे खाजगी अधिकार इत्यादी कारणे समोर करून सत्याला दडपण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे सत्य व खरी माहिती गोपनीय राहते. तसेच, न्यायालयाने प्रसिध्द् केलेली माहिती अगर प्रसिध्द् व्यक्तीच्या खाजगी जीवनातील सत्याला जाहिर करण्यास मनाई करतात. तात्पर्य असे की, एखादी गोष्ट सत्य असते म्हणून ती जाहिर केली जात नाही. म्हणूनच, मिलने प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा पूर्ण अधिकार असावा अशी आग्रही भूमिका घेतली होती. मिलने अभिव्यक्तीस्वातंत्र्याबाबत जी भूमिका घेतली ती माहितीचा अधिकार कायद्याला पूरक आहे असे म्हटले तर ते चूकीचे ठरणार नाही.

थोडक्यात, पारदर्शकता, उत्तरदायित्त्व, प्रशासकीय कार्यक्षमता, भ्रष्टाचाराला विरोध, सर्वसामांन्यांचे सबलीकरण ही माहितीचा अधिकार कायद्याची महत्त्वाची उद्दिष्ट्ये असून खुले प्रशासन हा माहितीचा अधिकार कायद्याचा आत्मा आहे. त्यामुळे प्रशासनात सुसूत्रता, पारदर्शकता येणे अपेक्षित आहे आणि हे शक्य झाले तरच त्यातून लोकशाहीचे सक्षमीकरण होईल. वास्तविक पाहता, आजतागायत आपण आपली लोकशाही टिकवू शकलो याचा अनेकदा आपल्याला अभिमान वाटतो. प्रजासत्ताकाची प्रज्वलित ज्योत आपण विझू दिली नाही, ही बाब आपल्याला समाधान देते. अनेक अडचणींचा डोंगर पार करून विकास साध्य करताना आणि राष्ट्रीय एकात्मतेमधील गुंतागुंत सोडवितानाही लोकशाही कशी अबाधित राखता येते, हेच भारताने जगाला सिध्द् करून दाखवले आहे. लोकशाही कशी आणि किती आत्मसात झाली? लोकशाहीची तत्त्वे समाजातील जनमाणसांत यशस्वीपणे किती खोलवर रूजली? ही लोकशाहीची महत्त्वाची कसोटी आहे. माहितीचा अधिकार कायदा अन् अभिव्यक्तीस्वातंत्र्य यांचा योग्य तो मेळ घातल्यास भारतीय लोकशाहीच्या विकासाचा आलेख आणखी उंचावेल यात तिळमात्रही शंका नाही.

## संदर्भ :–


१. कायदा माहितीचा अन् अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा प्रल्हाद कचरे आणि शेखर गायकवाड, यशदा, पुणे.

२. राजकीय सिध्दांत परिचय

संपादक :– राजीव भार्गव आणि अशोक आचार्य

अनुवाद :– हेमंत खानझोडे

३. मदन राजाराम काळे, “ स्थानिक स्वशासनातील माहिती अधिकाराची अंमलबजावणी : औरंगाबाद महानगरपालिका व जिल्हा परिषद यांचा तुलनात्मक अभ्यास ” पीएच. डी. प्रबंध, २०१५

४. श्री. कुऱ्हे, माहिती अधिकाराचा सुशासनावरील परिणामाचा अभ्यास : विशेष संदर्भ परभणी जिल्ह्यातील महसूल विभाग

५. लोकशाही जाणीव आणि जोखीम

लेखक :– डॉ. पी. सी. अलेक्झांडर

अनुवादक :– डॉ. स्नेहलता देशमुख / डॉ. संजय ओक

सोमैया पब्लिकेशन प्रा. लि., मुंबई.